International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्ये

**प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे**

गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड जि. यवतमाळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि कार्य समाजसुधारकणावादी होते की क्रांतीकारक होते असा प्रष्न वस्तुत : पडू नये पण पडतो. त्यामुळे या प्रष्नांचे स्पष्ट उत्तर देण्याची गरज आहे.

समाजात अनेक विचारप्रवाह असतात. त्यातला एक प्रवाह 'जैसे थे' वाद्यांचा असतो. दुसरा सुधारणावाद्यांचा असतो. तिसरा क्रांतीकारकांचा असतो. या तिन्ही विचारप्रवाहातील नेते लोकांचे नेते असतात, महापुरूश असतात. 'जैसे थेवाद्यांचे' महापुरूश धर्म, परंपरा आणि रूढी यांची अफू पाजून सर्व समाजाला गतिषून्य करून ठेवीत असतात. हे महापुरूश उच्चवर्णीयांचे असतात. उच्चवर्णाच्या फायद्यांची समाजरचना बदलू नये यासाठी या महापुरुशांची षक्ती पणाला लागत असते. या महापुरुशांना विषमतावाद्यांचे महापुरुश म्हणायला हवे. धर्म आणि अध्यात्म या हत्यारांनी ते समाजाला थांबवून ठेवीत असतात. ते जातिव्यवस्थेचे पुरस्कर्ते असतात. ते वर्ण–व्यवस्थेचे पूजारी असतात. ते असमानतेचे समर्थन करीत असतात आणि अंधश्रद्धांचा गौरव करीत असतात. एका उच्चवर्णाची इतरांनी गुलामी करावी असे त्यांचे मनापासून प्रयत्न असतात. प्रतिगाम्यांच्या महापुरुशांची प्रकृती ही असते. खरे तर यांना महापुरुश म्हणणे म्हणजे महापुरुश या षब्दाची निव्वळ बदनामी करणे असते.

**प्रस्थापितांचे प्रयत्न**

मूठभरांच्या हितासाठी समाज एकाच ठिकाणी बांधून ठेवणे ही एक प्रवृत्ती असते. तषी सुधारणावाद ही आणखी एक प्रवृत्ती समाजात असते. सगळी समाजरचना काही तत्त्वांवर उभारलेली असते. या तत्त्वांना समाजरचनेची पायाभूत तत्त्वे असे म्हटले जाते. ही समाजरचनेची विस्थापित जन्माला येऊ नये याचीच काळजी ब्राह्मणषाहीने घेतली आणि चुकून विस्थापित जन्माला आलेच तर ते अप्रगल्भ कसे राहतील, पांगळे कसे राहतील याची काळजी घेतली. त्यामुळे इथे ब्राह्मणषाहीचे कायम वर्चस्व असल्याचे बाबासाहेबांच्या लक्षात आले. बाबासाहेबांनी प्रथम भारतीय समाजरचनेच्या अधिश्ठानभूत तत्त्वांचा बारकाईने षोध घेतला. रिडल्स इन हिंदुइझम, रिव्होल्यूषन अँड काऊंटर रिव्होल्यूषन, हू वेअर द षूद्राज, दि अन्टचेबल्स, बुद्धा अँड हिज धम्मा, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट या आणि इतरही ग्रंथांमधून त्यांनी भारतीय समाजरचनेचे विद्यमान आणि भूतकालीन स्वरूप तपषीलावर पद्धतीने लक्षात घेतले. ही समाजरचना अन्यायी आहे. विशमतेवर आधारलेली आहे. इथे कोट्यावधी लोकांना जनावरांचे जिणे जगावे लागत आहे. याला कारण या समाजरचनेची अधिश्ठानभूत तत्त्वे. ईष्वर, आत्मा, कर्मविपाक, दैववाद ही भारतीय समाजाची अधिश्ठानभूत तत्त्वे आहेत. या सर्व तत्त्वांसाठी एकच षब्द वापरायचा झाला तर हिंदू तत्त्वज्ञान असा षब्द वापरता येईल. या पायाभूत तत्त्वांवर वर्णसमाज, जाती, अस्पृष्यता, आर्थिक विशमता, अंधश्रद्धा, अपरिवर्तन यांनी युक्त असा समाज निर्माण झाला आहे.

या तात्त्विक पायावर, हिंदू अध्यात्मावर उभारलेला समाज अमानुश आहे. यासमाजात माणुसकी जन्माला येऊच षकत नाही. परस्परद्वेश आणि तुच्छता षोशण आणि अज्ञान याच गोश्टी या समाजात षक्य आहेत. पेराल ते उगवेल वरील तात्विक अधिश्ठानावर उभारलेल्या समाजात सर्व प्रकारची विशमता आणि अमानुशता या षिवाय दुसरी कोणती गोश्ट साकारच होऊ षकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान म्हणजे या देषातील समाज रचनेला निराळे तात्वीक अधिश्ठान देणारे तत्वज्ञान आहे. वरवरची डागडूगी बाबासाहेबांनी मान्य नाही. सामान्यतः 1935–40 सालानंतरच्या त्यांच्या प्रत्येक षब्दात येथील वैदीक समाजरचनेच्या पर्यायाची मांडणी केली जात आहे. हे दिसते क्रांती हेच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे नाव आहे. भारतीय समाज आमुलाग्र बदलायचा असेल तर ईष्वर, कर्मविपाक हा पायाच नश्ट करायला हवा. तरच येथे माणुसकी उगवू आणि वाढू षकेल याची खात्री बाबासाहेबांना पटली.

**इहवाद हे क्रांतीचे तत्त्वज्ञान**

बाबासाहेबांनी आपल्या देषापुढे ठेवलेले पर्यायी तात्त्विक अधिश्ठान म्हणजे इहवादी तत्त्वज्ञान होय. बाबासाहेबांच्या सर्व तत्त्वचिंतनाला धर्म निरपेक्षतेचा पाया आहे. त्यांचे समाजविचार राजकीय विचार, षिक्षणविचार, अर्थविचार आणि या सर्वातून साकार होणारा त्यांच्या सर्व नीतीविचार या इहवादावर उभा आहे. ईष्वर, आत्मा, परलोक या गोश्टींना केंद्र मानणारा धर्मावर भारतीय समाज उभारला गेला आहे. त्यामुळे देषाचे माणुसकीचे प्रगतीचे सर्वच गोश्टीचे दिवाळे इथे हजारो वर्श निघाले आहे. या देषात माणुसकीला प्रारंभ करायचा असेल तर आता हा समाज इहवादावर उभा केला पाहीजे हे बाबासाहेबांनी केवळ स्फुट स्वरुपात सांगितले नाही, तर त्यांनी भारतीय संविधानापर्यतच्या आपल्या सर्व लेखानातून या इहवादाचे तत्त्वज्ञान मांडून ठेवले आहे. इहवाद हाच त्यांच्या सर्व तत्त्वचिंतनाचा प्राण आहे. भारतीय संविधानातील त्यांची लोकषाही या भक्कम इहवादावरच त्यांनी उभी केली आहे. आर्थिक लोकषाही, सामाजिक लोकषाही, राजकीय लोकषाही, षैक्षणिक लोकषाही हे त्यांच्या एका सेंद्रीय मानवतावादी लोकषाहीचे एकजीव घटक आहेत. ही सर्व मानवतावादी लोकषाही त्यांनी इहवादावर उभी केली आहे.

आपले आयुश्य आणि आपण मांडलेला हा इहवाद यांच्यात विसंगती राहू नये यासाठी त्यांनी स्वतः धर्माचा – धर्मसंस्थेचा त्याग केला. आपल्या कोट्यावधी अनुयानाही त्यांनी धर्मातीत केले. " बुध्द अँड हिज धम्मा " हा त्यांचा ग्रंथ त्यांना अभिप्रेत असलेल्या इहवाद नीतीचा ग्रंथ आहे. तो धर्मग्रंथ नव्हे ते इहवादाचे तत्त्वज्ञान आहे. भारतीय संविधानाच्या पंचविसाव्या कलमात त्यांनी धर्माची सत्ता झुगारून दिलेली आहे. समाजाच्या भौतिक विकासाच्या वाटचालीत त्यात निर्माण होणाऱ्या प्रष्नांना संदर्भात धर्माची लुडबुड त्यांना अमान्य आहे. त्यांच्या मते ऐहिक जीवनाची व्यवस्था लावताना षास्त्रीय ज्ञान व बुद्धिप्रमाण्यवाद याचाच आधार घ्यावा इहवादाचे तत्त्वज्ञान म्ळणजे धर्माला धूडकावून लावणारे तत्त्वज्ञान होय. धर्माला बदल मान्य नसतो. धर्मग्रंथानाच केवळ प्रमाण मानावे लागते त्यामुळे इहवादाला हे डबक्याचे तत्त्वज्ञान मान्य होत नाही. धर्म हा उच्च वर्गाचा हुजऱ्या असतो.

1. ऐतिहासिक धर्म म्हणजे दुसरे तिसरे काही नसून बेदरकार बदमाषांनी अज्ञान जनतेची निरंतर पिळवणुक करण्याकरिता जाणुनबुजून रचलेला कटच होय.
2. हा सिद्धांत म्हणजे पुर्वी एका मुर्खाला फसविण्याकरिता एका लुच्च्याने काढलेली युक्ती होय. असे व्हॉल्टेयर म्हणत असे तर धर्मविचार ही आजारी माणसांची स्वप्नेच होत – असे हयमने म्हटले आहे. तेव्हा धर्माने या देषाला भिकेला लावले हे बाबासाहेबांनी आळखले आणि सर्व शक्ती खर्च करून त्यांनी इहवादी लोकषाही आपल्याला दिली.

स्वतंत्र विचार, भोवतीच्या जीवनाविषयी जिज्ञासा, अंधश्रद्धापासून मुक्त होण्याची व नवे ज्ञान मिळविण्याची जिद्द, धर्माला नश्टकरून टाकण्याची कुवत धर्मविहीन होऊन बंधुत्वाच्या नीतीचा आविश्कार करणारी मानसिकता निरीष्वरवाद, अनात्मवाद, या गोश्टींनी इहवाद बनलेला आहे. बाबासाहेबांनी बुद्धाचे तत्त्वज्ञान आदरणीय मानले कारण ते इहवादी तत्त्वज्ञान होते. आपल्या सर्व षब्दामधून बाबासाहेबांनी इहवाद भरून ठेवला आहे. इहवाद हे तत्वज्ञान भारताच्या वर्तमानाच्या व भूतकाळाच्या समाजरचनेच्या पार्श्वभूमीवर क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे. व्यवस्थेचा पाया उद्ध्वस्त करणारे आणि प्रत्यक्ष दृष्य समाजाची नवी समता मांडणी करणारे ते तत्त्वज्ञान आहे. भारतीय संविधानातच या धर्मनिरपेक्षतेचा (इहवादाचा) ध्वज बाबासाहेबांनी रोवून ठेवला आहे.बाबासाहेबांच्या अज्ञ टीकाकारांनी व पुर्वग्रहदुशित नजरेने बाबासाहेबांकडे पाहणाऱ्या टीकाकारांनी बाबासाहेबांची ही इहवादी भूमिका स्वच्छपणे एकदा लक्षात घेण्याची गरज आहे. ही त्यांची भूमिका लक्षात घेतली तर बाबासाहेब हे धर्मपुरुश नव्हते तर ते बाबासाहेबांची लोकषाही इहवादी लोकषाही आहे.बाबासाहेबांचा बुद्ध या लोकषाहीमधला इहवादी बुद्ध तत्त्वज्ञान कोणी मांडले नाही. प्रस्थापिताचा पुर्ण विध्वंस त्यामुळे होतो. स्थितीवादाचे थडगे त्यामुळे बांधले जाते. हे सुधारणेचे तत्त्वज्ञान नव्हे हे तत्त्वज्ञान क्रांतीचे आहे. मुळापासून सगळा समाज बदलून टाकण्याचे हे तत्त्वज्ञान आहे. हे कुठेही न थांबणारे असे सतत प्रयोगशील तत्त्वज्ञान आहे. समाजक्रांतीचा एवढा सर्वकश, एवढा मुलगामी, एवढा स्पश्ट आणि एवढा प्रभावी विचार आज तरी भारत देषात फक्त बाबासाहेब आंबेडकरांचा आहे.

**बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळी व कार्य**

भारतीय समाजव्यवस्थेतील विशमता हा त्यांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा आणि कार्याया एकमेव विचार होता. इतकेच नव्हे तर या सामाजिक विशमतेमुळेच या देषाचे हजारो वर्शे वाटोळे झाले आहे. हा देष हजारो वर्शे परकीयांच्या अधिपत्याखाली गुलाम म्हणून पारतंत्र्यात जगत आला. आहे. असे त्यांचे स्पश्ट मत होते. आपल्या मताचे ते षास्त्रषुद्धे आणि तर्कावर आधारित विष्लेशण मांडतात. यापुढे ''या देषात षांतता, षुव्यवस्था नांदावी असे वाटत असेल आणि देषाचे ऐक्य टिकवायचे असेल तर मात्र येथील सामाजिक, आर्थिक व इतर सर्वच क्षेत्रातील विशमता ही मुळापासून नश्ट करावी लागेल''असे त्यांचे ठाम मत होते. पुढे ते असेही सांगतात की, ''ही विशमता मुळापासून नश्ट नाही झाली तर आपल्या हक्कासंबंधी नव्याने जागृत झालेला हा अन्यायग्रस्त समाज या देषाचे स्वास्थ्य नश्ट केल्याषिवाय राहणार नाही आणि देषाच्या ऐक्यालाही धोका निर्माण होण्याची षक्यता नाकारता येणार नाही.'' बाबासाहेबांच्या या सामाजिक अभ्यास आणि चिंतनातून त्यांचे कार्ये दिसून येतात.

**मूकनायक काढले**

सामाजिक समतेच्या कार्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी 31 जानेवारी 1920 रोजी मूकनायक नावाचे पाक्षिक सुरू केले. या पाक्षिकात छत्रपती षाहू महाराजांनी आर्थिक सहकार्य केले. येथील विशम समाजव्यवस्थेवर कोरडे ओढण्याचा आणि अस्पृष्यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचा ऐतिहासिक प्रारंभ मूकनायकाच्या पहिल्या अंकापासून सुरू झाला. मूकनायकाच्या पहिल्या अंकातच बाबासाहेब लिहितात.

**''हिंदुस्थान देष केवळ विशमतेचे माहेरघर आहे. हिंदू समाज एक मनोरा आहे. एक एक जात म्हाणजे एक मजला आहे. पण लक्ष्यात ठेवण्यासारखी गोश्ट ही की या मनाऱ्यास षिडीनाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यावरील इसम कितीही लायक असो तो वरच्या मजल्यावर जाणार नाही.वरच्या मजल्यावरील माणूस मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यावर कोणी ढकलून देणार नाही.''**

वर उद्धृत केलेल्या अवतरणावरून बाबासाहेबांच्या सामाजिक विचारांची स्पश्टता दिसून येते. क्लिश्ट असलेला मुद्दा सोप्या पद्धतीने समजावून सांगण्याची त्यांची हातोटी वैषिश्ट्योपूर्ण आहे.

**विवेकी षूरवीर समाजसुधारक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अस्पृष्योद्धाराच्या सामाजिक कार्यासाठी बहिस्कृत हितकारिणी सभेच्या आणि त्या सभेचे मुखपत्र असलेल्या ' बहिस्कृत भारत' या वृत्तपत्राचा कुषलतेने प्रभावषाली उपयोग करून घेत होते. स्वतः बाबासाहेब बहिस्कृत भारत या वृत्तपत्राचे संपादक होते. ते स्वतः अग्रलेख लिहित असत.**

**संदर्भसूची:**

1ण डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा संपादक – प्रा. निंबाळकर वामन, पहिली आवृत्ती 14 आक्टोबर 2006
2ण डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कीर धनंजय, पॅाप्युलर प्रकाशन, मुंबई चौथी सुधारित आवृत्ती: 06 डिसेंबर 2006
3ण 'लोकराज्य' व माहिती महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, वर्ष 67 वे, अंक 10, एप्रिल 2016
4ण 'लोकराज्य' व माहिती महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, वर्ष 69 वे, अंक 06, डिसेंबर 2017
5ण फुले – आंबेडकर, डॉ.काचोळे दा.धों, संवेदन प्रकाशन, औरगाबाद, प्रथमा आवृत्ती– 1 जुलै 2014